नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २५/०१/२०२६ (रविवार)

---

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील उपविभागिय पोलीस अधिकारी श्री पराग पोटे आणि पोलीस निरीक्षक कैलास बाराभाई, यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर

**मा. राष्ट्रपतीं, भारत सरकार यांनी, गृह मंत्रालयामार्फत महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या उत्कृष्ट, प्रामाणिक व गुणवत्तापूर्ण सेवेस मान्यता देऊन गुणवत्तापूर्ण सेवेचे पदक (Meritorious Service Medal – MSM) जाहीर केले आहे.नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील १) उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पराग बाबुराव पोटे, काटोल उपविभाग आणि २) पोलीस निरीक्षक श्री. कैलास रामजी बाराभाई, बिनतारी संदेश विभाग, नागपूर ग्रामीण यांना त्यांच्या उत्कृष्ट, प्रामाणिक व गुणवत्तापूर्ण सेवेसाठी गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर झाले आहे.**

**श्री पराग बाबुराव पोटे** हे १९९५ सरळ सेवा पोलीस उप निरीक्षक तुकडी चे अधिकारी असुन त्यांची आजपर्यंत एकूण ३१ वर्षांची सेवा झालेली आहे. त्यांनी प्रथम ४ वर्ष नक्सल विरोधी अभियान करिता गडचिरोली येथे कर्तव्य पार पाडले.त्यासाठी त्यांना “विशेष पोलीस सेवा” पदकाने सन्मानित करण्यात आले. त्यांनी जिल्हा यवतमाळ, बुलढाणा, नागपूर, वर्धा येथे विविध महत्वाच्या पदावर सेवा दिली.त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण गुन्ह्यांचे तपास करून गुन्हे उघडकीस आणले. आर्थिक गुन्हे शाखा नागपूर शहर येथे गुंतागुंती च्या गुन्हयांची उकल केली. नागपूर शहर येथे जरीपटका लकडगंज, वाहतुक शाखा येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदाची जबाबदारी पार पाडली. त्यांना मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्राने गौरविण्यात आले.सध्यास्थितीत श्री पराग पोटे हे उप विभागीय पोलीस अधिकारी काटोल नागपूर ग्रामीण येथे कार्यरत आहे.

**श्री. कैलास रामाजी बारभाई** हे सन १९८६ मध्ये पोलीस दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान विभागात सहायक पोलीस उपनिरीक्षक/रेडिओ मेकॅनिक म्हणून पोलीस दलात रुजू झाले. त्यांची आजपर्यंत एकूण ३९ वर्षांची सेवा झालेली आहे. त्यांनी आपल्या सेवेतील १३ वर्षे गडचिरोलीच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागात सेवा केली असून, त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना २०१२ मध्ये “खडतर सेवा पदक” आणि २०१५ मध्ये “अंतर्गत सुरक्षा पदक” प्रदान करण्यात

आले आहे. सन २०२५ मध्ये मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे सन्मान चिन्ह व प्रशस्ती पत्राने गौरविण्यात आले. नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्ह्यात सर्व प्रकारच्या निवडणूक बंदोबस्तादरम्यान, जेव्हा पोलीस वायरलेस संवादा व्यतिरिक्त संवादाचे इतर कोणतेही साधन उपलब्ध नव्हते, तेव्हा त्यांनी सर्व मतदान केंद्रांवर वायरलेस संवादाची प्रभावी साधने बसवली. नक्षलग्रस्त भागात विविध नक्षलग्रस्त पोलीस चौक्यांमध्ये एकाच दिवसात पोलीस वायरलेस संवाद आणि वीज प्रणालीची स्थापना करण्यात आली त्यांमध्ये त्यांचा सहभाग आहे. त्यांनी नांदेड येथील गुरु—ता—गद्दी त्रिशताब्दी सोहळा—२००८ आणि नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळा २०१५ यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील सुरक्षा बंदोबस्तात सक्रिय सहभाग घेतला. २०२४ मध्ये, नागपूर ग्रामीण मधील सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीच्या बंदोबस्तादरम्यान काटेकोरपणे कर्तव्य पार पाडले. सध्यास्थितीत श्री. कैलास रामाजी बाराभाई हे (पोलीस निरीक्षक), बिनतारी संदेश विभाग, नागपूर ग्रामीण येथे कार्यरत आहे.



**श्री. पराग बाबुराव पोटे**



श्री. कैलास रामाजी बाराभाई

## गृह रक्षक व नागरी संरक्षण दलाच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी श्री. नागेश्वरराव पोडली आणि श्री गंगाधर उरकुडे यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर

**मा. राष्ट्रपतीं, भारत सरकार यांनी, गृह मंत्रालयामार्फत गृह रक्षक व नागरी संरक्षण दलाच्या गुणवत्तापूर्ण सेवेसाठी (Meritorious Service Medal – MSM ) पदके जाहीर झाली असुन १) श्री. नागेश्वरराव मालकोंडैया पोडली स.क्र. ३२९, पलटन नायक, पथक नागपुर शहर आणि २) श्री. गंगाधर वकाजी उरकुडे स.क्र. १५४४,सेक्शन लिडर, पथक मौदा यांना गुणवत्तापूर्ण सेवा पदक जाहीर झाले आहे**

**श्री. नागेश्वरराव मालकोंडैया पोडली स.क्र. ३२९, पलटन नायक, पथक नागपुर शहर** यांची २३ वर्ष सेवा पुर्ण झाली आहे त्यांनी सुध्दा संघटनेतील विविध प्रशिक्षण अवगत केले

असुन सन २०२३ मध्ये गुजरात मध्ये झालेल्या भुकंपात मरण पावलेल्या ईसमांच्या शवांची विल्हेवाट लावण्यात मदत केली. तसेंच लातुर येथे भुकंपामध्ये अडचणीत सापडलेल्या ईसमांना मदत केली. वैनगंगा नदीच्या पुरात वाहत येणाऱ्या ३४ मृतदेहांना शोधुन बाहेर काढले आणि काही जिवीतांच्या बचाब कार्यात सुध्दा सहभागी झाले.

तसेच **श्री. गंगाधर वकाजी उरकुडे स.क्र. १५४४ सेक्शन लिडर पथक मौदा** यांची ३० वर्ष सेवा पुर्ण झाली आहे. त्यांनी संघटनेतील विविध प्रशिक्षण घेतले असुन सन २०२३ मध्ये तारसा ते बाबादेव या दोन्ही गावामध्ये पुरामध्ये अडकलेल्या स्कुल बस मधील २०० ते २५० विदयार्थ्यांचा बचाव कार्यात त्यांचा सहभाग होता. श्री. नागेश्वरराव मालकोंडैया पोडली आणि श्री. गंगाधर वकाजी उरकुडेयांच्या या कार्यची दखल घेवुन त्यांना मा. राष्ट्रपती, भारत सरकार यांचे कडुन गृहरक्षक व नागरी सरंक्षण दलातील उल्लेखनीय व गुणवत्तापुर्ण सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक जाहीर केलेले आहे.



**श्री. नागेश्वरराव मालकोंडैया पोडली**



**श्री. गंगाधर वकाजी उरकुडे**

## पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील अवैध जुगार व्यवसायातील सराईत गुन्हेगार युनुस शेख अयुब शेख याला एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन काटोल :- पोलीस स्टेशन काटोल हद्दीतील सराईत **आरोपी नामे युनुस शेख अयुब शेख ,वय ४५ वर्षे, रा. पेठबुधबार, काटोल , जि. नागपुर** याने काटोल शहर व परिसरात अवैध जुगार अड्डे सुरू केले होते . नमुद आरोपीवर अवैध जुगाराचे ८ गुन्हे दाखल असून नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे असामाजिक प्रवृत्तीला चालना मिळत होती तसेच नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. पोलीसांनी त्याचेविरूध्द वेळोवेळी कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच

त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु आरोपी युनुस शेख याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली काटोल पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत **गुन्हेगार युनुस शेख अयुब शेख** याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता काटोल पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला दिनांक २४/०१/२०२६ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



**युनुस शेख अयुब शेख**

# पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील सराईत गुन्हेगार राजेंद्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर याला एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— पोलीस स्टेशन कळमेश्वर हद्दीतील सराईत आरोपी नामे **राजेंद्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर**,वय २६ वर्षे, रा. हुडको कॉलनी याचेवर जबरी जोरी, घरफोडी, चोरी, दुखापत, अवैधरित्या घातक हत्यार बाळगने, महीला अत्याचार या सारखे अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा शरीराविरूध्दचे तसेच मालमत्ते विरूध्दचे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित असतो. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे.परंतु आरोपी **राजेंद्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर** याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार **राजेंद्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर** याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता कळमेश्वर पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन त्याला दिनांक २४/०१/२०२६ रोजी मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.



**राजेंद्र उर्फ राजा अशोकराव पुसदकर**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा उपविभागिय पोलीस अधिकारी,कन्हान विभाग यांच कामगिरी ३० लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त

पोलीस स्टेशन मौदा :— दिनांक २५/०१/२०२६ रोजी श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग हे मौदा येथे बंदोबस्त कामी जात असतांना भंडारा— नागपूर महामार्ग क्र ५३ वर एक टिप्पर क्र. एम एच ४० सी टी ७४७५ हे वाहन समोरुन येताना दिसले सदर वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालक आरोपी नामे **प्रकाश शामराव बावणे, वय २९ वर्ष, रा गांधर वार्ड, गोपीवाडा, पोस्ट शहापुर, ता. जि. भंडारा २) क्लीनर नामे करण दिनेश गोंडाणे, वय २२ वर्ष, रा ढिवर मोहल्ला, मौदा, ता. मौदा जि नागपुर हे मिळुन आले.** आरोपीतांना

परवान्याबाबत विचारपुस केली असता कोणताही परवाना नसल्याचे समजले. वाहन मालकाचे नाव विचारले असता **आरोपी क्रं ३). प्रकाश भैय्याजी शिवणकर, वय ३६ वर्ष, रा.माथणी, ता मौदा, जि नागपुर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. वाहन मालकाच्या सांगण्यावरून रेतीची चोरटी वाहतुक केल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** १० ब्रास आणि **२)** टिप्पर क्र. एम एच ४० सी टी ७४७५ आणि ३) एक मोबाईल **असा एकुण ३०,५०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद प्रकरणी आरोपीतांविरूध्द पोस्टे मौदा येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम , कलम ०३ सार्व. संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## नरखेड पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन नरखेड**:— दिनांक २४/०१/२०२६ रोजी नरखेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोवाड ते जलालखेडा रेल्वे क्रॉसींग जवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान टाटा व्ही ३० वाहन क्र एम एच २७, बी. एक्स ९३७६ मिळुन आला. पोलीसांनी वाहन थांबवुन चालकाने नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे **अजित साहेबराव वटके वय २५ वर्ष रा. सुरळी ता, वरुड , जि. अमरावती अशी माहीती समजली**. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये **३ गोवंश जनावरे** असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपीला जनावर खरेदी विक्री पावती बाबत विचरणा केली असता त्याचे कडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून टाटा व्ही ३० वाहन क्र एम एच २७, बी. एक्स ९३७६ किंमती ४,००,०००/— रूपये. व ३ गोवंश जनावरे किंमती ७५,००० /— रूपयाचा एकुण किंमती ४,७५,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी विरूध्द प्राण्यांचा छळ अधिनियम सहकलम मोटर वाहन अधिनियम कलम २३(१),१७७ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ८ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद.
## रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २४/०१/२०२६ रोजी रामटेक पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, चिकन मार्केट,ताज चिकन सेंटर रामटेक येथे काही इसम ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचुन धाड टाकली असता आरोपी नामे **१). राजेश आनंदाराव ढोके, रा आंबेडकर वार्ड रामटेक, २) लक्ष्मीकांत नत्थु मेहर, रा. रामाळेश्वर वार्ड रामटेक जि**

**नागपुर,३) रोशन दिलीप गायकवाड, रा. आझाााद वार्ड रामटेक,४) अनिश सदराव शेख, रा. झेंडा चौक रामटेक,५) सलाम रज्जका मालाधारी, रा. रामाळेश्वर वार्ड रामटेक,६) वकील हनिफ कुरेशी, रा. जाफर नगर नागपुर,७) सरफराज हबीब मालाधारी, रा रामाळेश्वर वार्ड, रामटेक, जि नागपुर,८) राकेश शंकर नागपुरे, रा रामाळेश्वर वार्ड, रामटेक, जि नागपुर** यांना ५२ ताशपत्तयांचा जुगार खेळतांना जगीच पकडले. **पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ तासपत्ते, रोख रक्कम ९०४०/— रूपये आणि ७ मोबाईल असा एकुण कि ८००४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीतांविरूध्द कलम १२ म जु का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने